स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग
यांचे कार्यालय, नाशिक
आवक क्र. आ/गेवाय/ ४०
दिनांक ५ जानेवारी JAN १९९८
व. मु. ले. प. (व.), नाशिक

222

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.

दिनांक :- 1 JAN 1998

कार्यालयीन आदेश क्रमांक १७ दिनांक-

विषय :- जवाहर रोजगार निधीचे लेखा परीक्षण अद्यायावत करणेबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, कार्यालयीन आदेश क्रमांक ८, दिनांक २-१०-९४ अन्वये जवाहर रोजगार योजना निधीचे सन १९८९-९० ते सन १९९२-९३ पर्यंतचे थकीत लेखा परीक्षण मार्च-९४ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले होते, त्यानंतर असे लेखा परीक्षण सन १९९४-९५ या वर्षापर्यंत घेण्याबाबत, या कार्यालयाचे पत्र क्रमांक स्था. १८/व/जरोयो/श्रमदिन/१४८७ दिनांक १३-९-१९९६ अन्वये सूचीत करण्यात आले होते, आता असे आदेशित करण्यात येते की, जवाहर रोजगार योजना निधीचे लेखा परीक्षण अद्यायावत वर्षापर्यंतचे घेण्यात यावे. तथापि अशी कार्यवाही करताना सन १९८९-९० पासूनचे ज्या ग्रामपंचायतीचे जवाहर रोजगार योजनेचे लेखा परीक्षण अद्यापही हाती घेण्यात आलेले नाही, त्या ग्रामपंचायतीचे प्राधान्यावर लेखा परीक्षण प्रथम हाती घ्यावे. ग्रामपंचायत दौरा कार्यक्रम मंजूर करतांना उपमुख्य लेखा-परीक्षक यांनी याबाबत दक्षता घ्यावी.

लेखा परीक्षणाच्या प्रत्येक वाढीव घटकासाठी १ श्रमदिन देण्यात यावा.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

प्रत :-

१) उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, (सर्व) यांना माहितीसाठी/कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व) यांना माहितीसाठी/कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रति,
ग्रामण्य लेखा परिक्षक

२०९।५

विषय :- राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांना चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठी रजा प्रवास सवलतीबाबत
महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग निर्णय क्रमांक संकिर्ण-१०९७/[१८/९७]/शिकाना-२/९८/ माशि-२/दि. १ जानेवारी १९९८ [सचिव-२३ ता. १४.१.९८]

=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=*=

वाचावे :- १] शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक रप्रस-११९४/१८४/सेवा-५ दि. २८ मार्च-१९९५

२] शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-२६९५/[४५१]/ माशि-२ दि. २५ एप्रिल १९९७

__शासन निर्णय__ :- शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २६९५/[४५१]/ माशि-२, दि. २५ एप्रिल १९९७ अनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना उपलब्ध असलेली "चार वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठीची रजा प्रवास सवलत" ही योजना राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळांतील, माध्यमिक शाळांतील उच्च माध्यमिक शाळांतील तसेच अध्यापक विद्यालयातील कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मंजूर केलेली आहे. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या सहपत्रातील अटी व शर्तीपैकी अट क्र.५ अनुसार सन-१९९३-९६ या गटवर्षाची रजा प्रवास सवलत दि. ३१ डिसेंबर १९९७ पर्यन्त उपभोगण्यास परवानगी देण्यात आली होती. सदर शासन निर्णय शाळा प्रमुखांना उशिरा कळविण्यात आल्यामुळे दिनांक ३१ डिसेंबर १९९७ या मुदतीमध्ये सन-१९९३-९६ या गटवर्षाची रजा प्रवास सवलत बऱ्याचशा कर्मचाऱ्यांना उपभोगता आली नसल्याने सदर कर्मचारी या योजनेपासून वंचित राहिले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली होती. त्यामुळे ही मुदत वाढवून देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता घेतलेल्या निर्णयानुसार सन-१९९३-९६ या गटवर्षाची रजा प्रवास सवलत उपभोगण्याची दि. ३१ डिसेंबर १९९७ ही मुदत आणखी एक वर्षाने "एक खास बाब" म्हणून वाढवून देण्यात येत आहे.

२. सन-१९९३-९६ या गटवर्षाची प्रवास सवलत दि. ३१ डिसेंबर ९८ च्या आत उपभोगता येईल. या तारखेच्या आत प्रवास सवलत उपभोगली न गेल्यास सन १९९३-९६ या गटवर्षाची प्रवास सवलत व्यपगत होईल.

3. हे आदेश, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १३४६/सेवा-५, दि. १.१.१९९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-xxxxx
[स. रा. जाधव]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा
नवी मुंबई. ४०० ६१४

कार्यालयीन आदेश क्रमांक-७ दिनांक :- 6 FEB 1998

प्रत अग्रेषित :-

१] सर्व उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ] स्थानिकनिधी लेखा, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

२] सर्व उपमुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

३] लेखा परीक्षा अधिकारी स्थानिक निधी लेखा, नागपूर महानगर पालिका यांना कार्यवाहीसाठी.

४) संबंधित [illegible] -2

मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,
नवी मुंबई.

=-=-=-=-=-=

शविठा. २२९८